४० वर्षांची विश्वसनीय परंपरा...! सौंदर्याला तेज शुद्धतेचे!
BJD
बेलवलकर ज्वेलर्स
अविरत सेवा • शुद्ध सोने • खात्रीशीर दर
• मनोवेधक डिझाईन्स • हॉलमार्क प्रमाणित
KISNA किसना डायमंड ज्वेलरी मिळेल
प्रोप्रा. दीपक रा. बेलवलकर
9422434501, 9890111021
कल्प कॉर्नर, कांबळी गल्ली, बाजारपेठ, कणकवली


■ २२ कॅरेट सोने दर : १,४७,४००/- ■ चांदी दर : २,६५,०००/-

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

जसप्रीत बुमराह बनला टी-२० विश्वचषकाचा बादशहा

पान १०



सिंधुदुर्ग • मंगळवार १० मार्च, २०२६ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २२ • अंक १२० • पाने १० • ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in

# इस्त्रायलकडून लेबनॉनवर 'व्हाईट फॉस्फरस'चा हल्ला

## आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संस्थेचा आरोप

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पश्चिम आशियातील युद्ध अधिक तीव्र होत असताना 'ह्यूमन राईट्स वॉच' या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संस्थेने गंभीर आरोप केला आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार, इस्त्रायलच्या सैन्याने लेबनॉनमधील दक्षिण भागातील निवासी परिसरात 'व्हाईट फॉस्फरस' शस्त्रांचा वापर केल्याची पडताळणी केली आहे. संस्थेच्या अहवालानुसार, ३ मार्च २०२६ रोजी दक्षिण लेबनॉनमधील योहमोर या शहरातील घरांवर इस्त्रायली सैन्याने तोफखान्याद्वारे 'एअरबर्स्ट व्हाईट फॉस्फरस'चा मारा केला. या हल्ल्यानंतर किमान दोन घरे आणि एका कारला आग लागल्याचेही समोर आले आहे.

'ह्यूमन राईट्स वॉच'ने या घटनेशी संबंधित सात छायाचित्रांची पडताळणी करून त्यांचे भौगोलिक स्थान निश्चित केल्याचे सांगितले. या छायाचित्रांमध्ये नागरी संरक्षण कर्मचारी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. संस्थेचे लेबनॉन संशोधक रम्झी कैस यांनी सांगितले की, निवासी भागात पांढऱ्या फॉस्फरसचा वापर करणे अत्यंत चिंताजनक असून त्याचे नागरिकांवर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यांच्या मते, 'व्हाईट फॉस्फरस' हा अत्यंत ज्वलनशील पदार्थ असल्यामुळे तो शरीरावर पडल्यास मृत्यू किंवा गंभीर भाजल्या जखमा होऊ शकतात. अशा जखमांमुळे पीडितांना आयुष्यभर त्रास सहन करावा लागू शकतो. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार हा रासायनिक पदार्थ मानवी वस्तीत वापरणे अत्यंत धोकादायक आणि वादग्रस्त मानले जाते.

**इस्त्रायलच्या लष्कराचे मौन**

दरम्यान, या आरोपांवर इस्त्रायली लष्कराने अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, यापूर्वी अशाच आरोपांना उत्तर देताना इस्त्रायलने म्हटले होते की, ते व्हाईट फॉस्फरसचा वापर केवळ 'स्मोक स्क्रीन' (धुराचे पटल) तयार करण्यासाठी करतात, नागरिकांना लक्ष्य करण्यासाठी नाही. दरम्यान, ह्युमन राइट्स वॉच आणि ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या संघटनांच्या मते, इस्त्रायल आणि हिजबुल्ला यांच्यातील संघर्षादरम्यान यापूर्वीही अनेकदा दक्षिण लेबनॉनमध्ये व्हाईट फॉस्फरसचा वापर झाल्याच्या नोंदी आहेत. (पान २ वर)



# आठही पंचायत समित्यांवर महायुतीचा बिनविरोध झेंडा फडकला!

- खासदार नारायण राणेंच्या नेतृत्वाचा करिष्मा; जिल्ह्यात विरोधक निष्प्रभ
- कणकवली, सावंतवाडी, मालवणसह चार तालुक्यांच्या सभापतीपदी महिलांची बाजी

**नवनियुक्त सभापती**



| कणकवली | कुडाळ | मालवण | सावंतवाडी | देवगड | वेंगुर्ले | वैभववाडी | दोडामार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हर्षदा वाळके | मिलिंद नाईक | प्रज्ञा चव्हाण | सुस्मिता जाधव | गणेश राणे | शंकर घारे | सिध्देश रावराणे | पार्वती गवस |

**नवनियुक्त उपसभापती**



| कणकवली | कुडाळ | मालवण | सावंतवाडी | देवगड | वेंगुर्ले | वैभववाडी | दोडामार्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| राजेश सावंत | सिताराम तेली | घनश्याम झाड | गौरव मुळीक | अमोल लोके | सचिन देसाई | साची कोलते | गणेशप्रसाद गवस |

**सिंधुदुर्ग (प्रतिनिधी)**

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या राजकीय पटलावर महायुतीने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. जिल्ह्यातील सर्व आठही तालुक्यांच्या पंचायत समिती सभापती आणि उपसभापती निवडीत महायुतीने विरोधकांना पूर्णपणे निष्प्रभ करत सर्वच्या सर्व जागांवर बिनविरोध विजय मिळवला. खासदार नारायण राणे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री नितेश राणे आणि आमदार निलेश राणे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली जिल्ह्याच्या सत्तेच्या चाव्या आता पुन्हा एकदा भक्कमपणे महायुतीच्या हाती आल्या आहेत.

या सत्तांतराचा सर्वाधिक मोठा परिणाम कुडाळ पंचायत समितीमध्ये पाहायला मिळाला. १० वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर येथे पुन्हा एकदा 'राणे' पर्व परतले असून, सभापतीपदी मिलिंद नाईक तर उपसभापतीपदी सिताराम तेली यांची बिनविरोध निवड झाली. (पान २ वर)

### सर्व सभापती, उपसभापतींचे अभिनंदन



कुडाळ पं.स. सभापतीपदी मिलिंद नाईक तसेच मालवण पं. स. सभापतीपदी सौ. प्रज्ञा चव्हाण यांची निवड झाली आहे. आपल्यावर सोपविण्यात आलेल्या नव्या जबाबदारीमुळे विकास प्रक्रियेला अधिक गती मिळेल आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी प्रभावी उपक्रम राबवले जातील, असा विश्वास आहे. मी खा. नारायण राणे साहेब आणि जिल्ह्याचे पालकमंत्री नितेशजी राणे यांचे विशेष आभार मानतो. दोन्ही सभापतींचे आणि उपसभापतींचे हार्दिक अभिनंदन व पुढील कार्यासाठी शुभेच्छा. - आमदार निलेश राणे

# दोन अर्ज बाद ठरल्याने राज्यसभा निवडणूक बिनविरोध

**मुंबई (प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी होणारी निवडणूक अपेक्षेप्रमाणे बिनविरोध झाली आहे. गुरुवारी दाखल झालेल्या नऊ अर्जांपैकी दोन अपक्ष उमेदवारांचे अर्ज तांत्रिक कारणास्तव बाद ठरल्याने सात जागांसाठी सातच उमेदवार रिंगणात उरले. यामध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासह सातही नेत्यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

या निवडणुकीत संख्याबळानुसार भाजपला ४, तर शिवसेना, राष्ट्रवादी आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांना प्रत्येकी एक जागा मिळाली आहे. उमेश म्हात्रे आणि कांते सायन्ना या दोन अपक्ष उमेदवारांनीही आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, त्यांच्या अर्जावर सूचक आणि अनुमोदकांच्या सह्या नसल्याने छाननीमध्ये हे दोन्ही अर्ज बाद ठरवण्यात आले. त्यामुळे ही निवडणूक अपेक्षेप्रमाणे बिनविरोध झाली.

भाजपने यंदा राज्यसभेत राज्यातील महत्त्वाच्या समाजघटकांना प्रतिनिधीत्व दिले आहे. नागपूरच्या माजी महापौर राहिलेल्या माया इवनाते (पान २ वर)

# आंबा-काजू मोहर जळण्याचे कारण काय?


- कोकण कृषी विद्यापीठ कोणते संशोधन करतेय?; कोणत्या उपाययोजना करणार ?
- आंबा-काजू मोहराच्या नुकसानीबाबत खासदार नारायण राणे आक्रमक
- कोकण कृषी विद्यापीठाला अहवाल सादर करण्याचे आदेश

**कणकवली**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा व काजू पिकांच्या मोहराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर सिंधुदुर्ग - रत्नागिरीचे खासदार नारायण राणे यांनी डॉ. संजय भावे, कुलगुरू डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांना पत्र पाठवून याबाबत माहिती मागवली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात यावर्षी हवामानातील अनियमित बदल, तापमानातील तीव्र चढ-उतार तसेच विविध कीड-रोगांच्या प्रादुर्भावामुळे आंबा व काजू पिकांचा मोहर जळून गेल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपेक्षित उत्पादनावर परिणाम झाला असून शेतकरी व आंबा बागायतदारांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

अनेक शेतकरी व आंबा बागायतदारांनी प्रत्यक्ष भेटून याबाबत खंत व्यक्त (पान २ वर)





नारायण राणे
Narayan Rane
संसद सदस्य (लोक सभा)
Member of Parliament (Lok Sabha)
दि. 6 MAR 2026
प्रति
डॉ. श्री. संजय भावे
कुलगुरु - कोकण कृषी विद्यापीठ
दापोली, रत्नागिरी.
यांसी सस्नेह नमस्कार!
विषय :- आंबा व काजू नुकसानी संदर्भात...
आपला नम्र,
(नारायण राणे)

# इंधन तुटवड्याबाबतच्या अफवांवर विश्वास ठेवू नका

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)**

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार तेल आणि गॅसबाबत काळजी घेत आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिती आपल्या सगळ्यांना माहिती आहे. पण तरीही कुठेही तुटवडा पडू नये, यासाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना सुरु आहेत. कुणीही अफवा पसरवू नये आणि कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केले. (पान २ वर)

### विरोधकांना तोंड दाखवायला जागा नाही

शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनावर भाष्य करताना फडणवीस म्हणाले, 'आता विरोधकांना तोंड दाखवायला जागा उरलेली नाही. गिरे तो भी टांग उपर असे विरोधकांचे सुरु आहे. (पान २ वर)

# कणकवली आणि तळेरे बस स्थानकाचा होणार विकास



सिंधुदुर्गचे पालकमंत्री ना. नितेश राणे यांनी सोमवारी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली आणि तळेरे बस स्थानकाचा पीपीपी मॉडेलवर विकास करण्यासंदर्भात नुकतीच मंत्रालयात बैठक आयोजित केली होती. या बैठकीदरम्यान प्रस्तावित बस स्थानक उभारणीबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यावेळी बस स्थानकाच्या आधुनिक सुविधा, प्रवाशांसाठी आवश्यक सोयीसुविधा तसेच परिसराच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर, बांधकाम विभागाचे महाव्यवस्थापक दिनेश महाजन, विभागीय अभियंता अक्षय केकरे आदी उपस्थित होते.

# दुसऱ्या सिलिंडरच्या बुकींगसाठी २५ दिवसांचे अंतर बंधनकारक!

- युद्धामुळे एलपीजी गॅसचा प्रचंड तुटवडा
- हॉटेल, कंपन्यांसाठीच्या गॅसवर बंदी
- घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीत ६० रुपयांनी वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)**



तेल विपणन कंपन्यांनी घरगुती एलपीजी सिलिंडरच्या बुकिंग नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. नवीन नियमानुसार, आता दोन सिलिंडर बुक करण्यामध्ये किमान २५ दिवसांचे अंतर असणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे गॅसचा काळाबाजार रोखण्यास मदत होईल, असा दावा केला जात आहे. युद्धामुळे एलपीजी गॅसचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. यामुळे हॉटेल, कंपन्यांसाठीच्या गॅसवर बंदी आणण्यात आली आहे. तसेच घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीदेखील ६० रुपयांनी वाढल्या आहेत. त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे ग्राहकांकडून साठा करण्याची किंवा हे सिलिंडर हॉटेल व्यावसायिकांना (पान २ वर)

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार ; आरोपी अमृत पालवला २० वर्षे सश्रम कारावास

## व्हॉट्सॲप मैत्री अन् नंतर अत्याचार; नराधमाला 'पोक्सो' अंतर्गत कठोर शासन : सिंधुनगरी विशेष न्यायालयाचा निकाल

**सिंधुनगरी (प्रतिनिधी)**

मालवण तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीसोबत व्हॉट्सॲप द्वारे ओळख निर्माण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी अमृत उर्फ केतन सखाराम पालव (१९, रा. वडाचापाट, मालवण) याला विशेष न्यायालयाचे न्यायाधीश डॉ. सुधीर देशपांडे यांनी २० वर्षे सश्रम कारावास आणि ३० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता रुपेश देसाई यांनी काम पाहिले.



आरोपी अमृत पालव

आरोपी अमृत पालव याने पीडित मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही २०२० मध्ये व्हॉट्सॲप द्वारे पीडितेशी ओळख निर्माण करून मैत्रीचे संबंध निर्माण केले होते. दरम्यान या कालावधीत त्याने पीडितेला काजूच्या बागेत बोलवून तिच्यावर जबरदस्तीने तीनवेळा लैंगिक अत्याचार केला होता. यातून ती मुलगी गर्भवती राहिली होती. त्यामुळे २३ जानेवारी २०२१ रोजी अमृत याच्या विरोधात मालवण पोलीस ठाण्यात भा. दं. वि. कलम ३७६(१), ३७६(२)(एन) सह (पान २ वर)

# राज्यात नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना स्थगिती

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)**





वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ९ मार्चपासून राज्यभर नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. तथापि, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत, या संदर्भात निर्णय घेतला जाईल, त्यानूसार पुढील निर्णय घेतला जाणार आहे, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

याबाबत मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य सरकारकडे असल्याचे स्पष्ट करत भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने महाराष्ट्र शासनाला (पान २ वर)

# सोशल मीडियावर महिलांविषयी आक्षेपार्ह टिप्पणी करणे भोवणार

## गृहमंत्रालयासोबत समन्वय साधून कठोर कारवाईचे मंत्री आदिती तटकरे यांचे संकेत

**मुंबई**

सोशल मीडियाच्या माध्यमातून सामान्य महिलांपासून ते महिला अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच खालच्या पातळीवर जाऊन लक्ष्य केले जात आहे. अशा प्रवृत्तींमुळे महिलांच्या मनःस्वास्थ्यावर गंभीर परिणाम होत असून, हे प्रकार रोखण्यासाठी राज्य सरकार आता कठोर पावले उचलणार आहे. सायबर गुन्हेगारी आणि महिलांविरोधी टिप्पणी रोखण्यासाठी गृहविभागासोबत विशेष समन्वय साधला जाईल, अशी घोषणा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोमवारी विधानसभेत केली.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी (पान २ वर)

### लाडक्या बहिणी आल्या मुख्य आर्थिक प्रवाहात

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या यशाचा उल्लेख करताना आदिती तटकरे म्हणाल्या की, "या योजनेमुळे राज्यातील महिला खऱ्या अर्थाने मुख्य आर्थिक प्रवाहात आल्या आहेत. योजनेचे पैसे थेट खात्यात जमा करण्याच्या अटीमुळे आजवर बँक खाते नसलेल्या तब्बल ५० लाख महिलांनी बँकांमध्ये स्वतःचे खाते उघडले आहे, ही मोठी उपलब्धी आहे."